**कारणे दाखवा नोटिस**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/९९६२/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि.२७नोव्हेंबर,२०१८
ई मेल आय डी agridrip2015@gmail.com

**विषय** : विक्री पश्चात सेवा केंद्रांवरील कंपनी नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या माहिती बाबत...

कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र. कृआआ-२०१८/ प्र.म.कृ.सिं.यो./ कंनोंनुक/ भाग-१/ प्र.क्र. ०१/२०९३/ फलो-४, दि.३० जून २०१८ सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये समाविष्ट केलेल्या १४ तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नुतनीकरणास, सन २०१८-१९ साठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परिशिष्ट-१ मधील अनु क्र.०७ वर **मे.कपिलवस्तु मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था,** इदानी कॉम्प्लेक्स, डॉ.आंबेडकर चौक, कारंजा,(लाड),जि.वाशिम-४४४ १०५ यांना स्तंभ क्र.७ मध्ये नमुद केल्यानुसार राज्यातील एकूण १२ जिल्हयांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आपले कंपनीचे दिनांक २६/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कंपनीने विनंती केल्यानुसार मूळ आदेशातील स्तंभ क्र.७ मधील मंजूर १२ जिल्हयांमध्ये कंपनीने मागणी केलेल्या ०४ जिल्हयांची भर घालून कृषि आयुक्तालयाकडील भरपत्र-आदेश क्र.कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०१/८२६/फलो-४, दि.१८ऑगस्ट, २०१८ रोजीच्या भरपत्रानुसार एकुण १६ जिल्हयांमध्ये मान्यता प्रदान करणेत आली आहे.

आपले कंपनीचे दिनांक १/१०/२०१८ रोजीच्या विनंती अर्जाद्वारे आपले कंपनीने उपरोक्त नमूद भरपत्रा मधील मंजूर १६ जिल्हयांमध्ये ०३ जिल्हयांची भर घालून एकुण १९ जिल्हयांमध्ये सुक्ष्म सिंचन योजनेचे काम करण्यास मान्यता मिळणे बाबत पुनःश्च विनंती केली आहे.

जिल्हेवाढीसाठी आपण सादर केलेल्या विनंती अर्जासोबत सहपत्रित केलेला कंपनी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील पडताळणीसाठी त्यांचे नावासमोर नमूद दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता आपण सादर केलेल्या यादीतील श्री.**बी.व्ही.लकडे, सुमित ढोले, संदिप गिरी व प्रमोद गायकवाड** या कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये तफावत आढळून आली आहे.

उपरोक्त नुसार जिल्हेवाढीसाठी आपण कृषि आयुक्तालयास सादर केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यामुळे आपले कंपनीस दिलेले नूतनीकरणाचे आदेश रद्द का करणेत येऊ नयेत याबाबतचा खुलासा सदरची नोटिस मिळालेपासून १० दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा खुलासा सादर न केलेस नियमा नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

**मे.कपिलवस्तु मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था,**
**इदानी कॉम्प्लेक्स, डॉ.आंबेडकर चौक,**
**कारंजा,(लाड),जि.वाशिम. पिन-४४४ १०५**
Dilip.bhojraj@gmail.com